


दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २०१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०४ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## एसटी प्रवाश्यांना आता सवलतीच्या प्रवासासाठी एनसीएमसी कार्डची सक्ती नाही



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०३, मुंबई :** राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून सवलतीच्या दरात प्रवास करणाऱ्या कोट्यवधी प्रवाशांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. एसटी प्रवासातील विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (NCMC) अनिवार्य असल्याच्या चर्चांना महामंडळाने पूर्णविराम दिला आहे. सवलतीच्या तिकिटासाठी हे स्मार्ट कार्ड सक्तीचे नसून, प्रवाशांना पूर्वीप्रमाणेच त्यांच्या अधिकृत ओळखपत्राच्या आधारे सवलत मिळत राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडिया आणि इतर माध्यमांतून अशा अफवा पसरल्या होत्या की, एसटीमध्ये सवलत मिळवण्यासाठी प्रवाशांना नवीन एनसीएमसी कार्ड काढणे बंधनकारक असेल. यामुळे ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि इतर सवलत धारक प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, एसटी महामंडळाने यावर स्पष्टीकरण देताना सांगितले की, कार्ड काढणे हा प्रवाशांचा वैयक्तिक निर्णय आहे. ज्यांच्याकडे हे कार्ड नसेल, त्यांना आधार कार्ड किंवा महामंडळाने दिलेले जुने ओळखपत्र दाखवून एसटीच्या सवलतीचा लाभ घेता येईल.

महामंडळाने एनसीएमसी कार्डची सुविधा ही केवळ प्रवासाचा अनुभव डिजिटल आणि सुलभ करण्यासाठी सुरू केली आहे. या कार्डमुळे प्रवाशांना 'कॅशलेस' प्रवास करता येतो आणि एकाच कार्डचा वापर मेट्रो किंवा इतर सार्वजनिक वाहतुकीसाठीही करणे शक्य आहे. मात्र, ग्रामीण भागातील आणि तांत्रिक बाबींची माहिती नसलेल्या प्रवाशांची अडचण होऊ नये, यासाठी महामंडळाने सक्तीचा निर्णय घेतलेला नाही.

दरम्यान एसटीमध्ये सध्या महिलांना ५० टक्के सवलत, अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास आणि इतर २९ विविध प्रवर्गातील प्रवाशांना सवलत दिली जाते. या सर्व सवलती पूर्वीप्रमाणेच सुरू राहणार आहेत. वाहकांकडे असलेल्या ईटीआयएम मशिनमध्ये आधार कार्ड किंवा ओळखपत्राची नोंद करून तिकीट देण्याची प्रक्रिया सुरूच राहील. त्यामुळे प्रवाशांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि कोणत्याही सक्तीशिवाय आपला प्रवास सुरू ठेवावा, असे आवाहन एसटी प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# लालपरीच्या महसुलाला नवा 'बूस्टर'

## एसटी मालामाल होणार; ५ वर्षांत २५० कोटी कमावण्याचे लक्ष्य !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, मुंबई :** राज्याची जीवनवाहिनी समजली जाणारी लालपरी बस आता आर्थिक सक्षमतेच्या दिशेने मोठं पाऊल टाकत आहे. केवळ प्रवासी वाहतुकीवर अवलंबून न राहता, उत्पन्नाचे पर्यायी स्रोत शोधून एसटी महामंडळाला तोट्यातून बाहेर काढण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. पुढील पाच वर्षांत केवळ जाहिरातींच्या माध्यमातून एसटी महामंडळाला २५० कोटी रुपयांहून अधिक महसूल मिळणार असल्याची माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.




**संचालक मंडळाच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय**

एसटी महामंडळाच्या मुख्यालयात पार पडलेल्या ३१० व्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. या बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सध्या एसटीला जाहिरातींतून वार्षिक २२ कोटी रुपये मिळतात. मात्र, नव्या निविदा प्रक्रियेमुळे या उत्पन्नात दुपटीहून अधिक वाढ होणार असून, वार्षिक सरासरी ५० कोटी रुपयांपर्यंत महसूल मिळणे अपेक्षित आहे.

**व्यापक जाहिरात आराखडा**

मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले की, एसटीची पोहोच राज्यातील प्रत्येक गावखेड्यापर्यंत आहे. महामंडळाची २५१ आगारे, ६१० बसस्थानके आणि सुमारे १२ हजार बसेसचा ताफा ही जाहिरातदारांसाठी मोठी बाजारपेठ आहे. या संसाधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी बसेसचा बाहेरील आणि आतील भाग जाहिरातींसाठी उपलब्ध केला जाईल. बसस्थानक परिसर आणि इमारतींचा वापर महसूल वाढीसाठी होईल. नव्या निविदा प्रक्रियेद्वारे पारदर्शकपणे कंत्राट देण्यात आले आहे.

**तोट्यातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न**

सध्या दररोज ५० ते ५५ लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात, ही संख्या भविष्यात १ कोटींपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. केवळ तिकीट विक्रीवर अवलंबून न राहता, तिकीटबाह्य उत्पन्नाचे स्रोत बळकट केल्यास एसटीला भविष्यात कधीही तोट्याचा सामना करावा लागणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जुन्या जाहिरातदारांची मुदत संपताच नवीन परवानाधारकांमार्फत हे काम जलद गतीने सुरू होईल, ज्यामुळे एसटीच्या आर्थिक स्थितीला मोठी उभारी मिळणार आहे.

## शेगाव तालुक्यात भव्य 'छ.शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर'

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, बुलढाणा :** सामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या शासकीय कामांतील अडचणी दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा १ शेगाव तालुक्यात राबविण्यात येत आहे.

- एकाच छताखाली १५ विभागांच्या सेवा, - मंडळांमध्ये विशेष शिबिरे
- महसूल प्रशासनाचा लोकाभिमुख उपक्रम

**शिबिराचे वेळापत्रक:**

७ मार्च – जवळा बु. मंडळ
१४ मार्च – जलंब मंडळ
१० एप्रिल – मनसगाव मंडळ
८ मे – शेगाव (शहर) मंडळ
१५ मे – माटरगाव मंडळ

या शिबिरात महसूल विभागासह महिला व बालविकास, आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन, सहकार, निवडणूक, नगर पालिका, दुय्यम निबंधक, वन, महावितरण, पंचायत समिती, अन्न व नागरी पुरवठा, संजय गांधी योजना, मनरेगा आदी विभाग सहभागी होणार आहेत.

- ७/१२ व ८-अ वाटप
- वारस नोंदी, फेरफार अदालती
- उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रीमीलेअर दाखले
- सामाजिक योजनांचे अर्ज व मंजुरी
- ई-केवायसी, आधार सिडिंग, पीएम किसान लँड सिडिंग
- आभा कार्ड, लाडकी बहिण योजना सेवा
- प्रॉपर्टी कार्ड, नकाशे वाटप, ई-मोजणी आणि इतर अनेक शासकीय सेवा...

## खापरखेडा वीज केंद्राचा 'रिमोट सायलो' प्रकल्प ठरतोय शोभेची वस्तू

**अक्षराज : दिवाकर घेर**
**दि.०३, नागपूर :**

पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी खापरखेडा वीज केंद्रात 'रिमोट सायलो' ही आधुनिक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली. मात्र, ही प्रणाली कागदावरच दिसत आहे. खापरखेडा व भानेगाव परिसरातील नागरिकांना कोळशाची धूळ आणि राखेचा सामना करावा लागत असल्याने हा कोट्यवधींचा रिमोट सायलो प्रकल्प केवळ 'शोभेची वस्तू' बनला आहे का ?असा संतप्त सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

प्रदूषणावर मात करण्यासाठी खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात रिमोट सायलो प्रकल्प उभारण्यात आला आहे. वीज केंद्रापासून काही अंतरावर रेल्वे ट्रॅकच्या जवळ कोळसा साठा साठवून ठेवण्यासाठी एक टाकी उभारण्यात आली आहे.

रेल्वे वॅगन्सद्वारे येणारा कोळसा उघड्यावर न टाकता थेट रिमोट सायलोमध्ये साठवून तो 'कन्व्हेयर बेल्ट'च्या साहाय्याने बॉयलरपर्यंत पोचविला जातो. ही व्यवस्था बंदिस्त असल्याने कोळसा पावसात ओला होऊ नये आणि वाऱ्यामुळे त्याची धूळ परिसरात पसरू नये अशी अपेक्षा होती. मात्र, प्रशासनाचे हे सर्व दावे फोल ठरत असल्याचे चित्र सध्या भानेगाव व खापरखेडा परिसरात बघायला मिळत आहे.



२ मार्च सोमवारला सायंकाळच्या सुमारास अचानक ५०० मेगावॅट खापरखेडा औष्णिक वीज केंद्रातून मोठ्या प्रमाणात धूळ व राख पसरली सदर घटनेची माहिती खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात कार्यरत अधिकाऱ्यांना देण्यात आली. मात्र रिमोट सायलो प्रकल्पा अंतर्गत धूळ व राखेवर नियंत्रण मिळविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

सदर प्रकल्प परिसरात एक प्लास्टिक जाळी बसवून नियंत्रण मिळविल्याचा देखावा निर्माण केला. मात्र तो पर्यंत भानेगाव व खापरखेडा परिसरातील नागरिकांच्या ताटापर्यंत राख पोहचली होती. होळी सारखा दिवस होता अनेकांच्या पुरणात राख मिसळली त्यामुळे अनेकांनी आपल्या घरात गोड पदार्थ तयार केले नाही.

एकिकडे सरकार खापरखेडा औष्णिक वीज केंद्र प्रशासन आधुनिक तंत्रज्ञानाचा डंका पिटत आहे, तर दुसरीकडे आम्हाला श्वास घेणेही कठीण झाले आहे, अशी भावना भानेगाव व खापरखेडा परिसरातील रहिवासी व्यक्त करत आहेत. पावसाळ्यात कोळसा भिजू नये म्हणून रिमोट सायलो यंत्रणा फायदेशीर ठरत असली तरी स्थानिक रहिवाशांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही यंत्रणा कुचकामी ठरली आहे. सुरक्षित आणि बंदिस्त कोठार प्रणालीचा दावा केला जात असताना परिसरात धुळीचे साम्राज्य पसरणे हे व्यवस्थापनाचे मोठे अपयश मानले जात आहे.

कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेली ही प्रणाली जर परिसरातील प्रदूषण रोखू शकत नसेल तर या खर्चाचा फायदा कोणाला? असा प्रश्न आता सामाजिक कार्यकर्त्यांकडून विचारला जात आहे. आधुनिकतेचा आव आणणाऱ्या या रिमोट सायलोमुळे जर सामान्यांच्या जगण्यावर गदा येत असेल, तर ही यंत्रणा केवळ कागदोपत्री प्रगती दर्शवण्यासाठीच आहे का? अशी शंका घेतली जात आहे.

आगामी काळात खापरखेडा वीज केंद्र प्रशासन या त्रुटींवर काय उपाययोजना करते आणि भानेगाव व खापरखेडा वासीयांच्या राखेच्या जाचातून मुक्त करते का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यासंदर्भात उपमुख्य अभियंता नितीन रोकडे (प्रशासन) यांच्याशी संपर्क साधला मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# बल्लारपूर रेल्वे स्थानक परिसरातून पळविलेल्या ३ वर्षाच्या चिमुकल्याची साडेतीन लाखात विक्री

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर रेल्वे स्टेशन परिसरातून आई-वडिलांच्या कुशीतून पळवलेल्या तीन वर्षांच्या चिमुकल्याचा चंद्रपूर पोलिसांनी अवघ्या २० तासांत शोध लावला. या चिमुकल्याला तेलंगणातील एका टोळीने साडेतीन लाखांत विकले असल्याची धक्कादायक माहिती मिळत आहे. या संदर्भातील अधिक माहितीनुसार पोलिसांनी तांत्रिक पुरावे आणि स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेच्या आधारे तेलंगणातील मंचेरियल गाठून पाच महिलांना अटक करून चिमुकल्याला पालकांच्या स्वाधीन केले. ऐलक्का बुद्दे (६०), राणी पसनोटी (३०), संगीता पानंगणती (४०), सर्व राहणार मंचेरियल, रा. तेलंगणा, सातक्का चंद्रया करेरे (५०), लावण्या कुमारस्वामी कोणा (३४) रा. मंथनी, मंचेरियल असे अटकेतील आरोपी महिलांची नावे आहेत. अन्य दोन जणांच्या शोधार्थ पोलिसांचे पथक रवाना झाले आहे.

बल्लारपूर रेल्वे स्टेशन परिसरात कचरा वेचून उदरनिर्वाह करणारी एक महिला २७ फेब्रुवारीच्या रात्री आपल्या कुटुंबासह रेल्वे स्टेशन समोरील मोकळ्या पटांगणात झोपली होती. रात्रीच्या गाढ झोपेत असताना अज्ञात इसमाने त्यांच्या तीन वर्षांच्या मुलाचे अपहरण केले. २८ फेब्रुवारीला सकाळी ही बाब लक्षात येताच बल्लारपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखा आणि बल्लारपूर पोलिसांची सात पथके तत्काळ रवाना केली. तक्रार येताच पोलिसांनी रेल्वे स्टेशन परिसरातील १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. यादरम्यान काही संशयास्पद हालचाली दिसल्या. दरम्यान, एका चारचाकीने मुलाला घेऊन मंचेरियलला गेल्याचे निष्पन्न होताच पोलिसांनी मंचेरियल गाठून स्थानिक पोलिसांच्या मदतीने छापा टाकून पाचही महिलांना अटक केली. ही कारवाई पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन,



अपर पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे, परीविक्षाधिन सहा. पोलिस अधीक्षक गौरव कायंदे पाटील, एसडीपीओ सुधीर नंदनवार यांच्या मार्गदर्शनात एलसीबीचे पीआय अमोल काचोरे, बल्लारपूरचे पीआय बिपीन इंगळे यांच्या नेतृत्वात एपीआय दीपक कांकेडवार, एपीआय बलराम झाडोकार, पीएसआय अभिषेक जंगमवार यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखा व बल्लारपूर पोलिसांनी केली. या टोळीने आणखी किती मुलांचे अपहरण केले आहे, याचा शोध आता पोलिस घेत आहेत. तेलंगणातील ऐलक्का बुद्दे, राणी पसनोटी, संगीता पानंगणती या महिलांनी दोन पुरुष साथीदारांसह रेल्वेस्थानकावर असलेल्या त्या मुलाच्या आई-वडिलांवर पाळत ठेवली होती. मध्यरात्री ते गाढ झोपेत असताना संधी साधून त्या मुलाचे अपहरण करून मंचेरियल गाठले. तिथे सातक्का करेरे आणि लावण्या कोणा या महिलांना ३ लाख ५० हजार रुपयांत विक्री केली.

# अस्थिरतेच्या खाईत प. आशिया

पश्चिम आशियात शांतता कधीच नव्हती; परंतु तिथे एक प्रकारचे स्थैर्य निश्चित होते. हे स्थैर्य काही गृहीतकांवर अवलंबून होते. त्यातील सर्वांत महत्त्वाचे होते, ते इस्रायल आणि अरब देश यांच्यात विभागलेली तेथील सत्ताव्यवस्था. सौदी अरेबियाच्या नेतृत्वाखाली अरब देशांनी इस्रायलच्या वर्चस्ववादी भूमिकेला विरोध न करणे, तसेच इस्रायलच्या आण्विक क्षमतेबाबत वाच्यताही न करणे; आणि या उलट पॅलेस्टाइनचा प्रदेश वगळता अरब राजकारणामध्ये इस्रायलने ढवळाढवळ न करणे हा या व्यवस्थेचाच एक भाग. या व्यवस्थेत इराणला फारसे महत्त्व दिले जात नव्हते. नव्वदच्या दशकात इराकशी झालेल्या युद्धामार्फत इराणने आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याला फारसे यश आले नाही. इराण अण्वस्त्रांच्या दिशेने वळला आणि एकाएकी त्या देशाचे पश्चिम आशियातील महत्त्व वाढले. त्याचा खरा धोका इस्रायलला जाणवला; कारण आता तिथे आण्विक क्षमता असलेला देश त्याच्यासमोर उभे राहणार होते.

आपल्या व्यतिरिक्त पश्चिम आशियात कोणीही अण्वस्त्रसज्ज होणार नाही, याची काळजी इस्रायल घेत आला आहे. म्हणूनच १९८१मध्ये इस्रायलने इराकच्या आण्विक केंद्रावर हल्ला करून त्या देशाला आण्विक कार्यक्रमापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचबरोबर गेल्या वर्षी इस्रायलने इराणच्या आण्विक केंद्रांवर हवाई हल्ला केला; परंतु त्याचा फार विपरीत परिणाम झाला, असे वाटत नाही. इराणला आण्विक कार्यक्रमापासून परावृत्त करण्यासाठी सुरुवातीला वेगवेगळे निर्बंध घालून इराणला आर्थिक दृष्ट्या अडचणीत आणण्याचे प्रयत्न झाले. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेमार्फत इराणच्या आण्विक कार्यक्रमाची चौकशी केली गेली आणि त्या कार्यक्रमावर निर्बंध घालण्यासाठी आणि देखरेखीसाठी तज्ज्ञांची नेमणूक केली गेली. नव्या इराणचा धोका अरब देशांनाही जाणवू लागल्यानंतर या प्रदेशातील सत्ताव्यवस्थेची जुनी गृहिते कोलमडली. इराणच्या विरोधात इस्रायल आणि पाश्चिमात्य देश एकत्र आली; इराणच्या आण्विक धोरणावर रोख आणण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करू लागली. त्यातील काही प्रयत्न हे राजनैतिक होते, तर काही लष्करी स्वरूपाचे.

पश्चिम आशियच्या राजकारणात स्वतःचे सत्तास्थान निर्माण करण्यासाठी इराण अनेक वर्षे प्रयत्न करीत होता. आण्विक तंत्रज्ञान विकास करणे या व्यतिरिक्त इराणने अरब देशांमधील अनेक शिया गटांना लष्करी मदत करून सक्षम बनवले होते. त्यात मुख्यतः येमेन मधील हुती आणि लेबेनानमधील हिजबुल्ला हे दोन गट महत्त्वाचे आहेत. २०२३मध्ये इस्रायलवर झालेल्या हल्ल्याला जबाबदार असलेला 'हमास' या पॅलेस्टाइन मधील गटाला याला देखील इराणकडून मदत झाली, असे मानले जाते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा सत्तेवर आल्यापासून आणि विशेषतः गेल्या वर्षी झालेल्या हल्ल्यानंतर इराणने आपली लष्करी क्षमता वाढवण्याचे व्यवस्थित प्रयत्न केले होते. अमेरिका आणि इस्रायल यांच्याकडून हल्ला होणार याची कल्पना इराणला होती. आपल्यावर हल्ला आल्यास अमेरिकेच्या पश्चिम आशियातील वेगवेगळ्या तळांवर हल्ला करू आणि त्याद्वारे हे युद्ध केवळ इराण आणि अमेरिका किंवा इराण आणि इस्रायल यांच्यापुरते मर्यादित न राहता त्याची व्याप्ती वाढवू, अशा स्वरूपाची धमकी दिली होती.

ज्यो बायडेन अमेरिकेचे अध्यक्ष होते तेव्हा त्यांच्या प्रशासनाने रशिया-युक्रेन युद्ध आणि युरोपची सुरक्षा यावर लक्ष केंद्रीत केले होते. ट्रम्प प्रशासनात युरोपचे महत्व कमी होत गेले. ट्रम्प यांचे लक्ष इराणकडे वळविण्यासाठी इस्रायल अमेरिकेवर सातत्याने दबाव आणत होता. इराणला आण्विक कार्यक्रमापासून दूर करायचे असेल, तर तिथे अमेरिकाधार्जिणी राजवट असण्याची गरज होती. एकेकाळी अमेरिकेने इराणमध्ये शहा रेझा पेहेलवी यांना सत्तेवर बसवले होते. १९७९च्या इस्लामी क्रांतीपासून इराणने अमेरिकाविरोधी भूमिका घेतली होती. ही इस्लामिक राजवट हटवून शहांच्या मुलाला सत्तेवर बसविण्याच्या हेतूने ट्रम्प यांनी आपले धोरण आखले. इराणच्या राजवटीवर ताबा मिळविल्यास अरब देश साथ देतील, अशी अमेरिकेची समजूत असून, ती बऱ्याच प्रमाणात खरी आहे. हे साध्य करण्यासाठी इस्रायलच्या वापराबाबत देखील अरब देश विरोध करणार नाहीत, हेही सत्य आहे. हल्ला झाल्यास अरब देशांतील अमेरिकेच्या लष्करी तळांवर प्रतिहल्ला करण्याचे इराणने जाहीर केल्यानंतर बऱ्याच अरब देशांनी या तळांचा वापर करू नये, असा आग्रह अमेरिकेकडे धरण्याचा प्रयत्न केला. अशा आग्रहाला अमेरिका फार जुमानणार नाही, याची या अरब देशांना निश्चित खात्री असणार होती; म्हणूनच हा लढा नौदलाच्या आरमाराच्या आधारे लढू अशी जाहीर भूमिका अमेरिकेने घेतली होती. तसेच, हा हल्ला आपण सुरू करणार नाही; मात्र इस्रायलने सुरू केल्यास त्याला पाठिंबा देणे हे आपले कर्तव्य असेल, असेही स्पष्ट केले.

आता इस्रायलने हल्ला केल्यानंतर अमेरिकेने त्याच बरोबरीने इराणवर हल्ला सुरू केला आहे. आजही इराणमधील इस्लामिक राज्यव्यवस्था बदलून तेथे लोकशाही सरकार स्थापन व्हावे, या हेतूने ट्रम्प हे इराणी जनतेला उद्देशून राजवट ताब्यात घेण्याचे आवाहन करीत आहेत. इराणने प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे आणि त्यात अरब देशांतील अमेरिकी लष्करी तळांना लक्ष्य केले आहे. या युद्धात रशिया किंवा चीन यांनी इराणच्या बाजूने भूमिका घेतली असली, तरी ते प्रत्यक्षात किती मदत करतील याबाबत शंका आहे. हे युद्ध आपल्या अस्तित्वाचे युद्ध आहे हे इराण जाणून आहे. म्हणूनच इस्रायल लक्ष्य असला, तरी हा लढा अमेरिकेच्या विरुद्ध आहे हे इराण जाणून आहे. अशा लढ्यामध्ये हुती किंवा हिजबुल्ला यांसारखे गट सक्रिय होणार हे उघड आहे.

# फिरकीचा जादूगार शेन वॉर्न

श्याम ठाणेदार, दौंड जि.पुणे
संपर्क : ९९२२५४६२९५



बरोबर चार वर्षापूर्वी आजच्याच दिवशी ( ४ मार्च २०२२ ) क्रिकेट विश्वाला धक्का देणारी बातमी आली आणि या बातमीने संपूर्ण क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली. ही बातमी होती फिरकीचा जादूगार ऑस्ट्रेलियाचा महान लेग स्पिनर शेन वॉर्न यांच्या निधनाची. शेन वॉर्नच्या आकस्मिक निधनाची बातमी क्रिकेट रसिक पचवू शकले नाही. अनेकांचा या बातमीवर विश्वास बसत नव्हता. शेन वॉर्न असा अकाली निघून गेल्याने क्रिकेट विश्वाला जबर धक्का बसला. शेन वॉर्न जाऊन आज दोन वर्ष झाली तरी या धक्क्यातून क्रिकेट रसिक अजूनही सावरू शकले नाही. वयाच्या अवघ्या ५२व्या वर्षी या महान गोलंदाजाने जगाचा निरोप घेतला. शेन वॉर्न हा केवळ ऑस्ट्रेलियाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फिरकी गोलंदाज होता. आपल्या फिरकीच्या तालावर त्याने जगातील सर्वच दिग्गज फलंदाजांना नाचवले. जवळपास वीस वर्ष त्याने आपल्या फिरकीच्या बळावर क्रिकेट विश्वावर राज्य केले.

१३ सप्टेंबर १९६९ रोजी ऑस्ट्रेलियाच्या फॉन्टरी गली येथे जन्मलेल्या शेन वॉर्नने जेंव्हा फिरकी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा त्याला सर्वांनी वेड्यात काढले कारण ऑस्ट्रेलिया म्हणजे वेगवान गोलंदाजांची भूमी . खेळपट्ट्या वेगवान त्यामुळे तिथे त्याची फिरकी चालणार नाही असेच सर्वांचे मत होते. अनेकांनी त्याला फिरकी गोलंदाजी न करण्याचा सल्ला दिला मात्र त्याने कोणाचेही ऐकले नाही. तो आपल्या निर्णयावर ठाम राहिला.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने चमकदार कामगिरी करून निवड समितीचे लक्ष वेधले. सातत्याने चांगली गोलंदाजी केल्याने अखेर त्याला ऑस्ट्रेलियाच्या मुख्य संघात प्रवेश मिळाला. १९९२ साली त्याने भारताविरुद्धच त्याने आपली पहिली कसोटी खेळली मात्र या कसोटीत त्याला विशेष काही करता आले नाही. भारताच्या फलंदाजांनी त्याची गोलंदाजी लीलिया खेळून काढली. याच कसोटीत भारताचा सलामीवीर रवी शास्त्रीने द्विशतक केले. पहिल्या कसोटीत विशेष काही करता न आल्याने त्याच्यावर टीकाही झाली. तो आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होणार नाही असाही तर्क अनेकांनी काढला मात्र त्याने हार मानली नाही. टिकाकारांकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या गोलंदाजीवर लक्ष केंद्रित केले. त्याचे फळ त्याला लवकरच मिळाले. इंग्लंड विरुद्धच्या प्रतिष्ठेच्या ऍशेस मालिकेत त्याने इंग्लंडच्या फलंदाजांना सलो की पळो करून सोडले. आपल्या फिरकीच्या बळावर त्याने ही मालिका ऑस्ट्रेलियाला एकहाती जिंकून दिली. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नची फिरकी समजलीच नाही. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नने अक्षरशः मामा बनवले. याच मालिकेत शेन वॉर्नने असा चेंडू टाकला की ज्याने फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच अचंबित झाले. शेन वॉर्नने इंग्लंडच्या माईक ग्याटिंग ऑफ साईडला चेंडू टाकला. ग्याटिंगला वाटले की चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर असल्याने तो वाईड ठरेल म्हणून त्याने तो सोडून दिला मात्र चेंडूने अचानक १८० अंशात वळून चक्क गाटिंगचा लेग स्टंपवर धडकला. या चेंडूने केवळ फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच हादरून गेले. असा चेंडू यापूर्वी क्रिकेट विश्वात कोणत्याची गोलंदाजाने टाकला नव्हता म्हणूनच या चेंडूला बॉल ऑफ सेंच्युरी असे म्हणतात. न भूतो न भविष्यती असा तो चेंडू होता. १९९३ साली शेन वॉर्नने हा स्वप्नवत चेंडू टाकला. आज इतक्या वर्षानंतरही हा चेंडू क्रिकेट रसिकांच्या स्मरणात आहे.

शेन वॉर्नची गोलंदाजीची शैली अनोखी होती. या अनोख्या शैलीनेच त्याने १४५ कसोटीत ७०८ बळी घेतले. त्यातील ४४८ बळी हे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये घेतले. येथे एक लक्षात घ्यावे लागेल की या दोन्ही देशातील खेळपट्ट्या वेगवान गोलंदाजीसाठी पोषक असतात. वेगवान खेळपट्ट्यांवर इतके बळी मिळवणे ही अनन्यसाधारण गोष्ट आहे. त्याने १४५ कसोटीत खेळताना ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा अधिक बळी घेतले आहेत तर तर कसोटीत १० किंवा १० पेक्षा अधिक बळी त्याने १० वेळा घेतले आहेत. इतकेच नाही तर त्याने १९४ एकदिवसीय सामन्यात २९३ बळी घेतले आहेत. १९९९ साली इंग्लंडमध्ये झालेला विश्वचषक ऑस्ट्रेलियाने शेन वॉर्नच्या फिरकीच्या बळावरच जिंकला होता.

शेन वॉर्नने जगभरातील दिग्गज फलंदाजांना आपल्या फिरकीच्या तालावर अक्षरशः नाचवले. जगातील सर्वच देशात त्याने अप्रतिम कामगिरी करीत बळी मिळवले मात्र त्याला भारतात म्हणावे तसे यश मिळाले नाही. सचिन आणि वॉर्न यांचे क्रिकेट मैदानावरील द्वंद्व क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरायचे. सचिनला बाद करण्यासाठी वॉर्न जंग जंग पछडायचा मात्र त्याला त्यात यश मिळायचे नाही. शारजात झालेल्या मालिकेत सचिनने वॉर्नची चांगलीच पिटाई केली तेंव्हा सचिन मला स्वप्नातही दिसतो अशी कबुली त्याने दिली होती. मैदानावर हे दोन महान खेळाडू एकमेकांसमोर उभे ठाकत असले तरी मैदानाबाहेर मात्र हे दोघे एकमेकांचे जिवलग मित्र होते. १९९० ते २०१० असे वीस वर्ष ऑस्ट्रेलियाने क्रिकेट विश्वावर एकहाती हुकूमत गाजवली त्यात शेन वॉर्नचा मोठा वाटा होता.

निवृत्तीनंतर शेन वॉर्नने समालोचन केले. २००८ साली आयपीएलचा पहिले सत्र पार पडले. या पहिल्या सत्रात शेन वॉर्न राजस्थान रॉयल्स या संघाचा कर्णधार होता. विशेष म्हणजे या संघात शेन वॉर्न वगळता एकही स्टार खेळाडू नव्हता. या संघात तरुण आणि नवख्या खेळाडूंचा भरणा होता तरीही शेन वॉर्नने आपल्या चतुरस्त्र गोलंदाजीने आणि नेतृत्व गुणाने राजस्थान रॉयल्स ला विजेतेपद मिळवून दिले.

शेन वॉर्नच्या मृत्यू नंतर क्रिकेट विश्वाची मोठी हानी झाली. त्याच्या सारखा महान फिरकी गोलंदाज पुन्हा होणार नाही. फिरकीचा जादूगार शेन वॉर्नला चौथ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

## होलिकोत्सव

होलिकोत्सवसण रे
खरा असे प्राकृतिक
वैशाखी नव पालवी
निसर्ग रे कौसृतिक

पुरातन अमोल ठेवा
महानता सांस्कृतिक
एकत्र आणी सकला
सूर जुळे सांगीतिक

हानी रे पर्यावरणाची
निसर्ग राजाअगतिक
उलटी चालेलेपाऊले
कसे सणाचे कौतिक

कृतज्ञता विसरलेली
विरली स्व प्रकृतिक
वृक्षतोड मुळापासून
कृत्ये करी नैकृतिक

हवामान हो प्रदुषित
वेदनाहोई अत्यंतिक
छेड छाड संधी साधे
नाते विसरले नैतिक

ऑनलाईन नवहोली
रंग उधळे सांकेतिक
प्रगत युगात बदलावे
शिक्षणा दिसोप्रतिक

प्रल्हादाचे जाणसत्व
होली कथा दृष्टांतिक
हिंदूचासण न केवळ
बनो उत्सवजागतिक

- हेमंत मुसरीफ, पुणे.
९७३०३०६९९६

# नात्यांमुळे विश्वास नसतो; विश्वासामुळे नाती असतात!

आजच्या काळात माणूस नात्यांनी वेढलेला आहे; पण तरीही एकटा आहे. घर आहे, कुटुंब आहे, मित्र आहेत, सोशल मीडियावर शेकडो कनेक्शन्स आहेत; पण तरीही मनात खोल कुठेतरी एक अस्वस्थ शंका दाटलेली आहे. खरंच माझ्यावर विश्वास ठेवणारा कुणी आहे का? कारण आज नात्यांची संख्या वाढली आहे; मात्र विश्वासाची उंची मात्र कमी होत चालली आहे. आपण अनेकदा गृहीत धरतो की नातं असेल, तर विश्वास आपोआप येईल. आई-वडील आहेत म्हणजे विश्वास, पती-पत्नी आहेत म्हणजे विश्वास, मित्र आहेत म्हणजे विश्वास. पण वास्तव वेगळंच सांगतं.

नातं असणं आणि विश्वास असणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. खरं तर सत्य हे आहे, नात्यांमुळे विश्वास नसतो; विश्वासामुळे नाती असतात. नातं जन्माला येतं, पण विश्वास घडवावा लागतो. नातं अनेकदा जन्माने, कागदाने किंवा परिस्थितीने मिळतं. आई-वडील, भाऊ-बहीण, नवरा-बायको, नातेवाईक ही नाती आपल्याला विचारल्याशिवाय मिळतात. पण विश्वास मात्र मिळत नाही; तो कमवावा लागतो. तो शब्दांपेक्षा कृतीतून तयार होतो. तो एका दिवसात नाही, तर असंख्य छोट्या प्रसंगांतून आकार घेतो. आज आपण नात्यांवर हक्क सांगतो; पण विश्वासासाठी लागणारी जबाबदारी मात्र स्वीकारत नाही. मी तुझा आहे असं म्हणणं सोपं आहे; पण मी तुझ्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही हे जगणं कठीण आहे. विश्वास तुटला की नात्याचा सांगाडा उरतो. विश्वास तुटणं म्हणजे फक्त फसवणूक नव्हे.

कधी ऐकून न घेणं, कधी वेळ न देणं, कधी गरज असताना अनुपस्थित राहणं, कधी गोष्ट लपवणं, कधी सत्य टाळणं..

या सगळ्या गोष्टी मिळून विश्वासाला हळूहळू पोखरत जातात. एकदा विश्वासाला भेग पडली की नातं जिवंत राहतं; पण आत्मा हरवतो. बाहेरून हसणं, औपचारिक बोलणं सुरू राहतं; पण आतला संवाद संपतो. मग नातं नावापुरतं उरतं, जणू एखादं जुनं घर, ज्यात भिंती उभ्या आहेत; पण उब नाही. आजच्या काळात माणूस नात्यांपेक्षा व्यवहारात जास्त प्रामाणिक दिसतो. व्यवहारात करार असतो, अटी असतात, कायदेशीर चौकट असते; त्यामुळे फसवणूक कमी होते. पण नात्यांत अशी कुठलीही चौकट नसते, तिथे फक्त विश्वास असतो आणि तोच आज सर्वात दुर्मिळ झाला आहे. म्हणूनच आज लोक व्यवहारात सावध, पण नात्यांत संशयी झाले आहेत. तो काय म्हणेल?, ती खरं बोलतेय का?, यामागे काही स्वार्थ तर नाही ना? अशा शंका नात्यांच्या मधोमध उभ्या राहिल्या आहेत. प्रेम असू शकतं; पण विश्वास नसेल तर ते प्रेम असुरक्षित होतं. मैत्री असू शकते; पण विश्वास नसेल तर ती सोयीची ठरते. नातं असू शकतं; पण विश्वास नसेल तर ते ओझं बनतं. विश्वास म्हणजे अंधपणा नाही.

विश्वास म्हणजे दुसऱ्याच्या हातात स्वतःचं मन सुरक्षित आहे, ही खात्री. विश्वास म्हणजे समोरचा आपली कमजोरी आपल्याविरुद्ध वापरणार नाही, ही निश्चितता. विश्वास म्हणजे आपलं मौनही समजून घेतलं जाईल, ही भावना. विश्वास मागता येत नाही, तो पात्रतेने मिळतो. आज अनेक नात्यांत एक विचित्र अपेक्षा दिसते, तू माझ्यावर विश्वास ठेवायलाच हवा पण विश्वास ही मागणी नाही; ती पात्रतेची पावती आहे. जो सातत्याने खोटं बोलतो, तो विश्वास मागतो. जो वेळ देत नाही, तो विश्वासाची अपेक्षा करतो.

जो जबाबदारी टाळतो, तो विश्वासावर हक्क सांगतो. खरं तर विश्वास हा अधिकार नाही; तो सन्मान आहे आणि सन्मान नेहमी पात्रतेतून मिळतो. आज हा प्रश्न फक्त वैयक्तिक नात्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही. समाज, संस्था, राजकारण, प्रशासन सर्वत्र विश्वासाचा दुष्काळ आहे. लोकांना माणसांपेक्षा कागदावर जास्त विश्वास वाटतो. शब्दांपेक्षा पुराव्याला जास्त किंमत आहे. कारण आपण वारंवार अनुभवले आहे की नाती बदलतात, पण फसवणूक कायम राहते. त्यामुळे माणूस हळूहळू स्वतःभोवती संशयाची भिंत उभी करतो. ती भिंत त्याला वाचवतेही; पण एकटंही करते.

विश्वास टिकवणं ही मोठी साधना आहे, म्हणजे दररोज स्वतःशी प्रामाणिक राहणं. चुकीची गोष्ट मान्य करणं. क्षमायाचना करणं आणि समोरच्याला गृहीत न धरणं. नात्यांत प्रेम कमी झालं तरी चालेल; पण विश्वास कमी होता कामा नये. कारण प्रेम पुन्हा निर्माण होऊ शकतं; पण तुटलेला विश्वास जोडणं फार अवघड असतं. आपण अनेकदा विचारतो की, लोक विश्वासघात का करतात? पण कधी स्वतःला विचारतो का, मी कुणाचा विश्वास जपला आहे का? मी दिलेला शब्द पाळला आहे का? मी कुणाच्या मनाशी प्रामाणिक राहिलो आहे का? जर आपण स्वतः विश्वासार्ह बनलो, तर नाती आपोआप अर्थपूर्ण होतील. कारण शेवटी सत्य एकच आहे, नाती असतात म्हणून विश्वास येत नाही;

विश्वास असतो म्हणून नाती टिकतात.

- प्रवीण बागडे, नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शिक्षणज्योती सुशिला माईंना पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०३, खंडाळा (सातारा) :** माजी सातारा जिल्हा परिषद सदस्या, माजी संचालिका खंडाळा विभाग शिक्षण समिती तसेच राजेंद्र विद्यालयाच्या माजी शिक्षिका स्व.सुशिला शंकरराव गाढवे यांच्या आठव्या पुण्यस्मरणानिमित्त खंडाळा विभाग शिक्षण समितीच्या विविध शैक्षणिक संकुल वतीने राजेंद्र विद्यालय प्रांगणात अभिवादन करण्यात आले. प्रारंभी स्व.सुशिलामाईंच्या प्रतिमेचे पूजन शिक्षणमहर्षी शंकरराव गाढवे यांच्या हस्ते करण्यात आले. स्व.सुशिला शंकरराव गाढवे यांच्या कार्य-कर्तृत्वाबद्दल बोलताना प्रा.मनोज यादव म्हणाले-खंडाळा पंचक्रोशीतील वाड्या वस्त्यांवर शिक्षण पोहोचवण्यासाठी शिक्षणमहर्षी शंकरराव गाढवे सर यांनी घेतलेला वसा नेटाने चालविण्यासाठी सुशिला माईंनी अविरत साथ दिली. कवी सुरेश भट यांच्या गझलीत वर्णन केल्याप्रमाणे मी एकटाच त्या रात्री आशेने तेवत होतो, मी विझलो तेव्हा सारे आकाश उजळले होते... या पंक्तीनुसार आज सुशिलामाईंच्या पश्चात शंकरराव गाढवे रुपी वटवृक्षाच्या छायेत आपली संस्था प्रगतीची शिखरे गाठत आहे. आपण शिक्षक, प्राध्यापक म्हणून विद्यार्थी प्रगतीसाठी झटून काम करूया हीच शिक्षणज्योती स्व.सुशिला गाढवे माईंना श्रद्धांजली ठरेल. यावेळी खंडाळा विभाग शिक्षण समितीचे उपाध्यक्ष सुरेश पवार, सचिव संजीव गाढवे, संचालक वसंतराव पंडित, दत्तात्रय गाढवे, पदाधिकारी, विविध शाखा प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका, प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी, आदींनी साश्रू नयनांनी माईंना अभिवादन केले.

## कामगार आयुक्त कार्यालयावर भव्य आक्रोश मोर्चाची घोषणा



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०३, सोलापूर :** भारतीय मजदूर संघ संलग्न महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ यांचे ६ वे त्रैवार्षिक अधिवेशन दि. १ मार्च २०२६ रोजी पुणे येथे उत्साहात पार पडले. अधिवेशनाचे उद्घाटन अखिल भारतीय अध्यक्ष एस. मल्लेशम यांच्या हस्ते झाले. स्वागताध्यक्षा खासदार मेधा कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे महावितरण चे संचालक राजेंद्र पवार उपस्थित होते.

एस. मल्लेशम यांनी वेज कोड व सोशल सिक्युरिटी कोडची प्रभावी अंमलबजावणी, समान 'मिनिमम फ्लोअर वेज', पेन्शन फंड वाढ व ईएसआयसी पात्रता मर्यादा २१ हजारांवरून ४२ हजार करण्याची मागणी केली. मेधा कुलकर्णी यांनी कंत्राटी कामगारांना कायम करण्याच्या न्यायालयीन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

प्रदेशाध्यक्ष ॲड. अनिल ढुमणे यांनी दि. १६ एप्रिल २०२६ रोजी कामगार आयुक्त कार्यालय, बांद्रा (मुंबई) येथे भव्य आक्रोश मोर्चा काढण्याची घोषणा केली. हरियाणा पॅटर्ननुसार कंत्राटदारमुक्त रोजगार धोरण, सर्व कंत्राटी कामगारांना कायम सेवा, स्वतंत्र वेतनश्रेणी, जीवन वेतन व ईएसआयसी मर्यादा वाढ यांसह पाच ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.

अधिवेशनास सुमारे २३०० कामगार उपस्थित होते. पुढील कार्यकाळासाठी अध्यक्ष निलेश खरात व सरचिटणीस सचिन मेंगाळे यांची फेरनिवड करण्यात आली. आयोजन पुणे जिल्हा पदाधिकाऱ्यांनी यशस्वीरीत्या केले.

## 'लोहारडोंगरी' ची परवानगी रद्द करा, बंडू धोतरे यांचे ५ मार्च पासून अन्नत्याग सत्याग्रह




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघांच्या भ्रमणमार्गात प्रस्तावित असलेल्या ' लोहारडोंगरी' लोह खाण प्रकल्पाची वन्यजीव विषयक परवानगी नाकारण्यात यावी आणि जिल्ह्यातील गंभीर झालेला मानव-वन्यजीव संघर्ष निवारण्यासाठी इको - प्रो च्या प्रलंबित १६ मागण्यांच्या पूर्ततेसाठी इको- प्रो संस्थेचे अध्यक्ष बंडू धोतरे गुरुवार, ५ मार्च पासून अन्नत्याग आंदोलन सुरु करणार आहेत.

यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री, वनमंत्री, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) वनविभाग यांच्यामार्फत निवेदन सादर केले आहे. ब्रह्मपुरी वनविभागातील लोहारडोंगरी कक्ष क्रमांक ४३९ मधील हा प्रस्तावित प्रकल्प ताडोबाचा पूर्वेकडील महत्वाच्या कॅरिडॅारमध्ये आहे. या खाणीमुळे आधीच तीव्र असलेला ' मानव-वन्यजीव संघर्ष' खाणकाम आणि वाहतुकीमुळे जंगलाचे विखंडन होऊन अधिक तीव्र होईल. ताडोबाच्या पूर्व आणि उत्तर दिशेकडील जंगलांना जोडणारे वन्यप्राणी भ्रमणमार्ग विखंडित होण्याचा धोका आहे. ३५.९५ हेक्टर जंगलाच्या मधोमध असलेल्या समृध्द वन क्षेत्रातील १८,०२३ मोठ्या वृक्षांची कत्तल होणार आहे. या क्षेत्रात आढळणाऱ्या वाघ, बिबट्या, अस्वल यांसह ६० प्रकारच्या वनप्राण्यांच्या अधिवासावर गदा येणार आहे. परिसरातील जल, वायु प्रदुषण वाढीसोबत येथील मुख्य अर्थव्यवस्था असलेली शेती उद्योग प्रभावित होणार आहे.

मागील दीड दशकभरापासून इको-प्रो संस्थेने केलेल्या आंदोलन आणि पाठपुराव्यानुसार जिल्ह्याल मानव - वन्यप्राणी संघर्ष निवारण्याच्या प्रलंबित असलेल्या मागण्यांमध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील व्याघ्र संघर्षावर उपाययोजना करण्यासाठी राज्य सरकारतर्फे गठित ११ सदस्यीय तांत्रिक समितीच्या अहवालाची त्वरीत अंमलबजावणी व्हावी. चंद्रपूर-मुल मार्गावरील ओव्हरपास आणि बामणी-आष्टी मार्गावरील अंडरपासच्या कामांना मंजुरी देऊन बांधकाम सुरु करावे. कन्हाळगाव व घोडाझरी अभयारण्य वन्यजीव विभागाने ताब्यात घेऊन तेथे कर्मचारी नियुक्ती करावे व गावविकासाची कामे करावीत. जिल्हा परिषदेमार्फत संवेदनशील गावांना 'बिबट समस्यामुक्त ग्राम योजने' ला मंजुरी आणि निधी उपलब्ध करुन द्यावा. ताडोबा, कन्हाळगाव व घोडाझरी पर्टनातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा ५० टक्के प्रत्यक्ष लाभ स्थानिक गावांना मिळण्यासाठी निर्णय घेणे आदी मागण्यांचा समावेश आहे.

# शासनाची मोफत वाळू योजना ठप्प; तालुक्यातील घरकुल बांधकामे रखडली



वडगांव तेजन येथे शासनाच्या मोफत वाळू योजनेची अंमलबजावणी न झाल्याने रेती अभावी अपूर्ण अवस्थेत पडलेले घरकुल बांधकाम.

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, लोणार (बुलढाणा) :** लोणार तालुक्यातील ग्रामपंचायत हद्दीत शासनाच्या विविध योजनेंतर्गत घरकुल मंजूर झालेल्या घरांच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली वाळू उपलब्ध होत नसल्याने अनेक लाभार्थ्यांची घरकुले अर्धवट अवस्थेत पडून आहेत. महसूल विभागाकडून घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा करण्यात आली होती.

मात्र प्रत्यक्षात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने शासनाची मोफत वाळू योजना ठप्प असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. तालुक्यातील ग्रामपंचायत हद्दीत पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना तसेच शासनाच्या इतर घरकुल योजनेंतर्गत अनेक लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले असून मंजुरीनंतर लाभार्थ्यांनी घरकुल बांधकामास सुरुवात केली.परंतु बांधकामासाठी अत्यावश्यक असलेली वाळू वेळेवर उपलब्ध न झाल्याने अनेक घरकुलांची कामे अर्धवट अवस्थेत थांबली आहेत. रेती अभावी अनेक घरकुलांची कामे अपूर्ण स्थितीत पडलेली असून काही ठिकाणी पाया व भिंतीपर्यंतच बांधकाम झाले आहे, तर पुढील काम पूर्णपणे ठप्प झाले आहे. महसूल विभागामार्फत वाळू घाटांचा लिलाव होऊनही ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू मिळत नसल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शासनाकडून ग्रामीण घरकुलासाठी सुमारे १ लाख ३५ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. मात्र या मर्यादित निधीत घरकुलाचे पूर्ण बांधकाम करणे आधीच कठीण असताना वाळू मोफत मिळत नसल्याने लाभार्थ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. सध्या बाजारात एका ब्रास वाळूसाठी ९ ते १० हजार रुपये मोजावे लागत असल्याने अनेक लाभार्थ्यांना महागड्या दराने वाळू खरेदी करणे शक्य होत नाही. परिणामी अनेकांची घरकुले अपूर्ण अवस्थेत असून काही लाभार्थ्यांना तात्पुरत्या निवाऱ्यात राहण्याची वेळ आली आहे. याशिवाय घरकुल योजनेचे हप्ते वेळेवर जमा होत नसल्याने घरकुल धारक अधिकच अडचणीत सापडले आहेत.

बांधकामाच्या टप्प्यानुसार मिळणारे हप्ते वेळेवर न मिळाल्यामुळे सुरू केलेली कामे थांबवावी लागत असून अनेक लाभार्थ्यांवर आर्थिक ताण वाढत आहे. वाळू अभाव आणि हप्त्यांचा विलंब या दुहेरी संकटामुळे घरकुल योजना लाभार्थ्यांसाठी अडचणीची ठरत आहे. वाळू उपलब्ध करून देण्यासाठी लाभार्थ्यांनी महसूल विभाग व संबंधित प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे शासनाने मोफत वाळू योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून ग्रामपंचायत हद्दीतील घरकुल लाभार्थ्यांना तातडीने वाळू उपलब्ध करून द्यावी तसेच प्रलंबित हप्ते वेळेत वितरित करून घरकुल बांधकामे पूर्ण होण्यासाठी मदत करावी,अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे.

# पाणी पुरवठ्यासाठी घेतलेल्या विहिरीचा मोबदला रखडला

## पंचायत समिती लोणार च्या वारंवार चकरांनंतरही शेतकरी प्रतीक्षेत



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, लोणार (बुलढाणा) :** लोणार तालुक्यातील वडगाव तेजन गावातील पाणीपुरवठा सुरळीत राहावा यासाठी मागील वर्षी ग्रामपंचायतीमार्फत शेतकरी विकास तेजनकर यांच्या शेतातील विहीर अधिकृतरित्या अधिग्रहित करण्यात आली होती. गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची अडचण भासू नये, म्हणून विकास तेजनकर यांनी सहकार्याची भूमिका घेत आपली विहीर गावा साठी दिली.

त्यावेळी संबंधित विभागाकडून विहिरीचा मोबदला लवकरच दिला जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र एक वर्षाचा कालावधी उलटूनही विकास तेजनकर यांना अद्याप मोबदल्याची रक्कम मिळालेली नाही. याबाबत त्यांनी पंचायत समिती लोणार येथे वारंवार चकरा मारून संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेतली. प्रत्येक वेळी एक महिन्यात पैसे येतील, दोन महिन्यात मिळतील, असे सांगण्यात आले; परंतु आजपर्यंत प्रत्यक्षात मोबदला मिळालेला नसल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सध्या गावातील पाणीपुरवठा मोठ्या प्रमाणात याच विहिरीवर अवलंबून असून ग्रामस्थांना या विहिरीतून पाणी दिले जात आहे.

दरम्यान, उन्हाळ्याची तीव्रता वाढत असून गावातील इतर पाण्याचे स्रोत आटण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे या महिन्यात आणखी काही विहिरी अधिग्रहित करणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र मागील वर्षी अधिग्रहित केलेल्या विहिरीचाच मोबदला मिळालेला नसल्याने इतर शेतकरी विहीर देण्यास पुढे येण्यास तयार नसल्याचे चित्र आहे.

**विकास तेजनकर म्हणाले,**

गावाच्या पाण्यासाठी आम्ही आमची विहीर दिली. पंचायत समिती लोणार येथे अनेक वेळा जाऊन विचारणा केली. परंतु प्रत्येक वेळी एक-दोन महिन्यांत पैसे येतील असे सांगण्यात आले. आता एक वर्ष पूर्ण झाले तरी मोबदला मिळालेला नाही. जर असेच चालू राहिले, तर भविष्यात कोणीही गावा साठी आपली विहीर देणार नाही. त्यामुळे शासनाने तातडीने मोबदला द्यावा, अन्यथा गावातील पाणी परिस्थिती अधिक बिकट होऊ शकते.

## भाजप ट्रान्सपोर्ट सेल व कामगार युनियनच्या तालुकाध्यक्षपदी दीपक ठोंबरे



**अक्षराज : राजकूमार इकडे**

**दि.०३, सुपा (अहिल्यानगर) :** भारतीय जनता पार्टीच्या (भाजप) युवा नेते दीपक ठोंबरे यांची भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक जनरल कामगार युनियन (पारनेर तालुका) या संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. ही निवड महाराष्ट्र राज्य भाजप ट्रान्सपोर्ट सेल अध्यक्ष विजय हरगुडे आणि संघटनेचे संस्थापक अनुप मोरे यांनी जाहीर केली असून, निवडीचे अधिकृत पत्र त्यांना प्रदान करण्यात आले.

दीपक ठोंबरे हे पारनेर तालुक्यातील यादववाडी येथील सर्वसामान्य कुटुंबातून उदयास आलेले मेहनती नेते आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ते भाजपमध्ये सक्रिय असून, तालुक्यात युवकांचे मोठे संघटन उभे केले आहे. ट्रान्सपोर्ट सेलच्या माध्यमातून माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षा रक्षक कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी ते सातत्याने पाठपुरावा करतात.

निवडीनंतर पारनेर तालुका भाजप अध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांनी ठोंबरे यांचा सन्मान करत अभिनंदन व शुभेच्छा दिल्या. या नियुक्तीमुळे तालुक्यातील कामगार विभागातील भाजपची संघटना अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे. ही निवड पारनेर तालुक्यातील युवा कार्यकर्ते आणि कामगार वर्गासाठी प्रेरणादायी ठरली आहे.

## मणेरी येथे पालक पाद्यपूजन संस्कारमय उपक्रम उत्साहात



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०३, पाटण (सातारा) :** जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा मणेरी येथे विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित केलेला पालक पाद्यपूजन सोहळा अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांचे चरण प्रक्षाळन करून त्यांना वंदन केले आणि त्यांच्या कष्टांप्रती आदरभाव व्यक्त केला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. शाळेचे शिक्षक .विकास माने सर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, पालक हेच मुलांचे पहिले गुरु असून त्यांच्या त्याग, कष्ट आणि प्रेमामुळेच मुलांचे आयुष्य उजळते. या उपक्रमामागील उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता, आदर आणि संस्काराची भावना दृढ करणे हा असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी पालकांविषयी मनोगते व्यक्त करताना आई-वडील हेच खरे देव असल्याची भावना शब्दबद्ध केली. पाद्यपूजनाच्या वेळी अनेक पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले आणि संपूर्ण परिसर भावनिक वातावरणाने भारावून गेला. कार्यक्रमाला ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षकवृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करून शाळेच्या सामाजिक जाणीवेचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज वाघमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्येष्ठ शिक्षिका आतार मॅडम यांनी सोहळ्याची सांगता केली. विद्यार्थ्यांमध्ये संस्कारमूल्ये रुजविणारा हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय ठरला.

# हिंमत असेल तर राजीनामा देऊन पुन्हा निवडून या सुजित झावरेंचे आ.दातेंना खुले आव्हान

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** ज्याने काम केले, त्याचे श्रेय त्याला मिळालेच पाहिजे. ज्यांना सात-आठ वर्षांत जमले नाही, ते काम आम्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून करून आणले. आमदार काशिनाथ दाते यांनी उधारीच्या आमदारकीवर जगू नये, हिंमत,ताकद असेल तर आमदारकीचा राजीनामा द्या आणि पुन्हा निवडणूक लढवून दाखवा, अशा शब्दांत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांनी आमदार काशिनाथ दाते यांचे नाव न घेता तोफ डागली.

पारनेरच्या विकास आराखड्याला मंजुरी मिळवून दिल्याबद्दल झावरे यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना झावरे पाटील यांनी तालुयातील श्रेयवादाच्या लढाईवर सडेतोड भाष्य केले.

झावरे पाटील म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारनेरमधील प्रवेश सोहळ्यात डीपीआर मंजुरीचे आश्वासन दिले होते. आचारसंहितेमुळे या कामाला विलंब झाला, मात्र पाठपुरावा करून मी ही फाईल मार्गी लावली. मी सोशल मीडियावर पीडीएफ टाकली तर आमदारांच्या पोटात गोळा आला. त्यांना डीपीआर मंजूर झाल्याचा आनंद नाही, तर तो सुजित झावरे यांनी मंजूर केला याचे दुःख आहे. ज्यांना साधे ग्रामपंचायत सदस्य होण्याची लायकी नाही, त्यांना स्व. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी खासदार सुजय विखे यांच्या सांगण्यावरून आम्ही मदत केली आणि आमदार केले. आज तेच उपकाराची भाषा विसरले आहेत, अशी घणाघाती टीका त्यांनी केली. पारनेर शहराच्या पाणी योजनेबाबत बोलताना झावरे म्हणाले की, विकास आराखडा मंजूर नसल्याने पाणी योजनेत तांत्रिक अडचणी येत होत्या. आता तो मार्ग मोकळा झाला आहे. येत्या काळात मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांच्या माध्यमातून पारनेरकरांच्या सेवेत ही पाणी योजना कार्यान्वित करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**डीपीआरचा लाँग फॉर्म तरी माहिती आहे का ?**

1 माजी नगराध्यक्ष अशोक चेडे यांना डीपीआरचा लाँग फॉर्म तरी माहिती आहे का? करोना काळात चढ्या भावाने माल विकणाऱ्या वृत्तीचा वापर करून आमदार आपली पोळी भाजून घेत आहेत. येणाऱ्या नगरपंचायत निवडणुकीत जनताच त्यांना चोख उत्तर देईल, असा इशारा सुजित झावरे पाटील यांनी दिला. माजी आमदार विजय औटी यांनी कधीही खालच्या पातळीवर टीका केली नाही. दुसऱ्याच्या कामाचे श्रेय घेतले नाही, असेही झावरे म्हणाले.

**गोड बोलणारा अन् मनात विष असणारा माणूस**

2 आमदार दाते यांचा उल्लेख गोड बोलणारा पण मनात विष असलेला माणूस असा करत झावरे पाटील यांनी संताप व्यक्त केला. निवडणुकीच्या काळात ग्रामपंचायत सदस्य नसलेले हे माझ्या पाया पडायला आले होते. विधानसभा निवडणुकीत त्यांच्याकडे १०-१५ गावांत बूथ लावायला माणसे नव्हती,त्यांची व्यवस्था आम्ही केली. आम्ही एक विषारी झाडाला पाणी घातले,याची आज खंत वाटते, असेही ते म्हणाले.

# बालगंगा प्रकल्पग्रस्तांच्या बेमुदत उपोषणाचा पाचवा दिवस

## सातबारा मूळ मालकांच्या नावे करण्याची ठाम मागणी...

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०३, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील बालगंगा धरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या बेमुदत उपोषणाचा आज मंगळवार, दिनांक ०३ मार्च २०२६ रोजी पाचवा दिवस सुरू आहे. सातबारा उतारा मूळ मालकांच्या नावे परत करण्यात यावा. या प्रमुख मागणीसाठी प्रांत कार्यालयासमोर शुक्रवार, दि.२७ फेब्रुवारी २०२६ पासून उपोषण सुरू करण्यात आले आहे.गेली १६ वर्षे सुरू असलेल्या बालगंगा धरण प्रकल्प चे काम सुमारे ८० टक्के पूर्ण झाले असले तरी प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्या प्रलंबितच आहेत. शासनाच्या दुर्लक्षामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.उपोषणकर्ते संदीप पाटील, भरत कदम, शरद जाधव, वासुदेव पाटील व मधुकर हादगे हे पाच जण बेमुदत उपोषणास बसले असून, जोपर्यंत लेखी आदेश मिळत नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी व्यक्त केली आहे. सोमवारी प्रांत अधिकारी प्रवीण पवार व पाटबंधारे विभागाचे अधिकारी जाधव यांनी उपोषणस्थळी भेट दिली. तसेच पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल व पेण पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांनीही भेट देत परिस्थितीची पाहणी केली. पाली भूतीवळी धरण बचाव शेतकरी संघर्ष समितीने, आगरी कोळी युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष निलेश पाटील, यांनी आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शविला आहे.सन २०१० पासून प्रकल्पासाठी सुमारे १,२४० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे पेण तालुक्यातील नऊ गावे व तेरा आदिवासी वाड्यांतील सुमारे ३,८०० हून अधिक कुटुंबे बाधित झाली आहेत. 'नवीन भूसंपादन कायदा २०१३' मधील कलम १०१ नुसार, पाच वर्षांत वापरात न आणलेली संपादित जमीन मूळ मालकांना परत देण्याची तरतूद आहे. मात्र १६ वर्षांनंतरही अनेक जमिनींचे सातबारा उतारे कोरे असल्याने संबंधित जमीन पुन्हा शेतकऱ्यांच्या नावे करण्यात यावी, अशी प्रमुख म ागणी आहे.मागण्या तातडीने मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. देशभरात होळी-धुळवड सण साजरा होत असताना शेतकऱ्यांना उपोषणाचा मार्ग पत्करावा लागत असल्याची खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली.



देशभरात होळी सण साजरा होत असताना आम्ही पाच उपोषण कर्ते शुक्रवारी दि.२७ फेब्रुवारी पासून प्रात कार्यलया समोर बेमुदत उपोषणाला बसले आहेत परंतु सरकार पाच दिवस उलटुन गेले तरी अजून पर्यत बालगंगा प्रकल्पग्रस्तांच्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केले आहे व या मागण्याकडे अधिक उशीर झाल्यास उपोषण कर्त्याची प्रकृती जर खालवली तर याला जबाबदार सरकार असेल.

**- संदीप पाटील (उपोषणकर्ते)**

# थोडक्यात

## धुळवंदनाचा उत्साह लहानग्यांमध्ये उसळला...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, पेण :** रंगपंचमी अर्थात धुळवंदनाचा सण पेण शहरासह ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गल्लीबोळात लहानग्यांनी रंगांची उधळण करत आनंदोत्सव साजरा केला. सकाळपासूनच मुलांच्या चेहऱ्यावर विविध रंगांची उधळण दिसून येत होती. पिचकारी व रंगांच्या साहाय्याने एकमेकांना रंग लावत सणाचा आनंद द्विगुणित केला.

यावेळी मुलांनी बुरा ना मानो होली है म्हणत जल्लोष केला. काही ठिकाणी पाण्याच्या फुग्यांचाही वापर करण्यात आला. मोठ्यांच्या देखरेखीखाली लहान मुलांनी सुरक्षित पद्धतीने धुळवंदन साजरे केली.

धुळवंदन हा सण आपापसातील मतभेद विसरून आनंद, एकोप्याचा आणि बंधुभावाचा संदेश देणारा आहे.त्यामुळे प्रत्येकाला गावागावात धुळवंदन सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## आता आम्ही थांबणार नाही..!

## बोंडारवाडी धरणाच्या ट्रायलपीटसाठी निर्णायक लढा



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०३, जावली (सातारा) :** बोंडारवाडी धरणाची ट्रायलपीट तात्काळ सुरू करण्यात यावी, अन्यथा २२ मार्च रोजी होणाऱ्या मेळाव्यानंतर बेमुदत आंदोलन छेडले जाईल, असा ठाम आणि गर्भित इशारा डॉ.भारत पाटणकर यांनी प्रशासन व जलसिंचन विभागाला दिला आहे. या भूमिकेमुळे धरणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या बोंडारवाडी धरण प्रकल्पाबाबत लाभक्षेत्रातील ५४ गावांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे ट्रायलपीटचे काम सातत्याने पुढे ढकलले जात असून, त्यामुळे धरण निर्मितीचे स्वप्न पाहणारे कै. विजयराव मोकाशी आणि लाभक्षेत्रातील हजारो शेतकऱ्यांची आशा धूसर होत चालली आहे. पाणीटंचाई, शेतीचे नुकसान आणि स्थलांतराची वेळ आलेल्या शेतकऱ्यांसाठी हे धरण जीवनदायिनी ठरणार असल्याने प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लागावा, अशी सर्वांची अपेक्षा आहे.

याच पार्श्वभूमीवर नुकतीच डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली धरण कृती समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत प्रशासनाच्या ढिलाईवर तीव्र नाराजी व्यक्त करत आता आम्ही थांबणार नाही असा एकमुखी निर्धार करण्यात आला. ट्रायलपीट हा धरण निर्मितीच्या प्रक्रियेतील अत्यंत प्राथमिक आणि तांत्रिक टप्पा असून, प्रत्यक्ष धरणाच्या कामाला सुरुवात होण्यासाठी तो अत्यावश्यक आहे. ट्रायलपीट आणि प्रत्यक्ष बांधकाम यामध्ये मोठा कालावधी जातो, त्यामुळे सुरुवातीलाच होत असलेला विरोध प्रकल्पाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे.

धरणग्रस्त गावांचे योग्य व न्याय्य पुनर्वसन झाल्याशिवाय एकही वीट रचली जाणार नाही,आधी पुर्नवसन मग धरण हे शासनाचे धोरण असल्याचीही भूमिका यापूर्वीच जाहीर करण्यात आली असली तरी सध्याच्या घडीला ट्रायलपीटच्या काम ालाच विरोध होत असल्याने परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनली आहे. गेली १० ते १२ वर्षे सातत्याने प्रयत्न करूनही प्रकल्पाला गती मिळत नसल्याने लाभक्षेत्रातील नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष वाढत आहे.

२२ मार्च रोजी होणाऱ्या मेळाव्यात या प्रश्नावर सखोल चर्चा होणार असून, त्यानंतर आंदोलनाची पुढील दिशा ठरवली जाणार आहे. मात्र, ट्रायलपीट तात्काळ सुरू न झाल्यास बेमुदत आंदोलन अटळ असल्याचा इशारा देत कृती समिती व धरण समर्थकांनी आता निर्णायक लढ्याची तयारी सुरू केली आहे.

बोंडारवाडी धरण हा केवळ एक प्रकल्प नसून ५४ गावांच्या भवितव्याशी निगडित प्रश्न आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

# राजदेवांसारखे सारखे कार्यकर्ते प्रत्येक गावात हवेत - खा.लंकेची अपेक्षा

## वाढदिवसानिमित्त रक्तदान, नेत्रतपासणी व वृद्धांना काठ्यांचे वाटप



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** प्रत्येक गावात रविंद्र राजदेव यांच्यासारखा कार्यकर्ता उभा राहिला, तर तालुक्यात आरोग्य, शिक्षण आणि सर्वसामान्यांचा एकही प्रश्न शिल्लक राहणार नाही, असे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले. नांदूरपठारचे माजी सरपंच रविंद्र राजदेव यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिर, डोळे तपासणी शिबिर आणि वृद्धांना काठ्यांचे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

**सामाजिक उपक्रमांची जोड**

▶ वाढदिवस म्हटला की डीजे, फटाके आणि बॅनरबाजी अशी परंपरा रूढ झाली आहे. मात्र राजदेव यांनी वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, नेत्रतपासणी आणि वयोवृद्धांना आधारासाठी काठ्यांचे वाटप करून समाजोपयोगी संदेश दिला. येथे संकलित होणाऱ्या एका रक्तपिशवीमुळे एक जीव वाचतो, त्याचे कुटुंब वाचते, असे सांगत खा. लंके यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

**आरोग्य, शिक्षणासाठी मदत आवश्यक**

▶ एखाद्या व्यक्तीला सामान्य मदत आठ दिवसांनी दिली तरी चालते; मात्र वैद्यकीय उपचारासाठी मदत तात्काळ लागते. आरोग्य आणि शिक्षणासाठी विलंब चालत नाही, असे स्पष्ट करत त्यांनी राजदेव यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. आरोग्य-शिक्षणासाठी तत्परतेने धावणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे रविंद्र राजदेव, असे ते म्हणाले.

**मिश्किल टोला; उपस्थितांत हशा**

▶ जिल्हा परिषद निवडणुकीच्या संदर्भात बोलताना खा. लंके यांनी मिश्किल शैलीत वातावरण हलके केले. अनेकांनी रविंद्र राजदेव यांचा विचार करा असे सांगितले, तर काहींनी त्यांच्या पत्नी सोनिया यांची शिफारस केली. तुम्ही दोघांनी ठरवा माझा की तुझा नंबर? एकमत न झाल्यास छापा-काटा करा, नाहीतर 'शोले' चित्रपटातील सिक्का आणा! असे म्हणताच उपस्थितांत एकच हशा पिकला.

**'कर्म तुमच्यासोबत असते'**

▶ समय से पहले और भाग्य से अधिक किसी को कुछ नहीं मिलता. मात्र कष्ट करत राहा; कर्म तुमच्यासोबत असते, असे सांगत त्यांनी राजदेव दाम्पत्याच्या समाजकार्याचा गौरव केला. राजकारणात अनेक जण निवडणुकीपुरते फिरतात. निवडणूक झाली की लोकांना नमस्कारही करत नाहीत. मात्र राजदेव सरपंचपदापासून सातत्याने काम करत आहेत. त्यांनी कुटुंबाचा विचार न करता समाजासाठी स्वतःला वाहून घेतले.

यावेळी पारनेरच्या नगराध्यक्ष विद्याताई कावरे, उपनगराध्यक्ष सुप्रियाताई शिंदे, पंचायत समिती सदस्य जुन्नर शांताराम दाते, नांदूर पठार सेवा सोसायटी चे व्हा.चेअरमन बाळू चौधरी यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी दीपक लंके, राणीताई लंके, मोहनराव रोकडे, अशोक घुले, किरण ठुबे, प्रसाद नवले, महेंद्र गायकवाड, दिनेश चौगुले, पोपटराव गुंड, बाळासाहेब गुंड, दिपालीताई औटी, सारिकाताई आग्रे, प्रकाश चिकने, गंगाराम चिकने,पांडुरंग येवले ,अर्जुन भालेकर, योगेश मते, डॉ.बाळासाहेब कावरे, बाळासाहेब पुंडे, बापूसाहेब ठुबे, अजित भाईक, हरिभाऊ आहेर, नारायण राजदेव, भानुदास आग्रे ,जयराम चौधरी, दिनेश आग्रे, मदन देशमाने, दत्ता चौधरी गटातील सर्व आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक सोनिया राजदेव यांनी तर आभार रविंद्र राजदेव यांनी मानले.

# शेतकऱ्यांच्या भावना भडकवून राजकीय खेळी करु नका

## ५ मार्चपर्यंत कुकडीचे आवर्तन सुटणार - आ.दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** कुकडी डावा कालवा व पिंपळगाव जोगा डावा कालव्याच्या आवर्तनाबाबत काही घटकांकडून जाणीवपूर्वक गैरसमज पसरवून शेतकऱ्यांच्या भावनांना चिथावणी देण्याचा प्रयत्न सुरू असल्याची खंत व्यक्त करत आमदार काशिनाथ दाते यांनी शेतकरी बांधवांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे.

शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या पाण्याच्या प्रश्नाला राजकीय रंग देत स्वतःचे अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा डाव उधळून लावा, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

पारनेर-नगर विधानसभा म तदारसंघातील शेतकरी व ग्रामस्थांच्या पाण्याच्या प्रश्नासाठी आमदार दाते यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन कुकडी व पिंपळगाव जोगा कालव्याचे आवर्तन तातडीने सोडण्याची मागणी केली होती. त्यांच्या पाठपुराव्या- नंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेबांमार्फत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या असून कुकडी कालव्याद्वारे ५ मार्च दरम्यान तर २५ फेब्रुवारी ते १ म ार्च च्या दरम्यान पिंपळगाव कालव्यांद्वारे पाणी सोडण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

**शेतकऱ्यांनी प्रशासनावर विश्वास ठेवावा :**

गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही वेळेत आवर्तन सोडण्यात आले असल्याचे नमूद करत त्यांनी शेतकऱ्यांनी अफवांना बळी न पडता प्रशासनावर विश्वास ठेवावा, असे आवाहन केले. शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असून कोणत्याही परिस्थितीत त्यांना न्याय मिळवून देण्याची आपली बांधिलकी कायम राहील, अशी ग्वाहीही आमदार काशिनाथ दाते यांनी दिली.

येडगाव धरणातील अपेक्षित पाणीसाठा, तांत्रिक बाबी आणि सर्व लाभक्षेत्रांचा विचार करूनच आवर्तनाचे नियोजन केले जाते. दोन-तीन दिवसांचा विलंब तांत्रिक कारणास्तव होऊ शकतो; मात्र ५ मार्चपर्यंत पाणी निश्चितपणे उपलब्ध होईल, यावर कोणीही राजकारण करू नका.

## लासलगाव बाजार समितीच्या वतीने नवनियुक्त मर्चंट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार- डि.के.जगताप



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०३, विंचूर (नाशिक) :** लासलगाव येथील बाजार समितीच्या वतीने विविध संस्थांवर निवडून आलेल्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा विशेष सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. सार्वजनिक जीवनात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याची परंपरा जपत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी नाशिक जिल्हा कृषी औद्योगिक सहकारी संघाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राजेंद्र डोखळे, लासलगाव प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हारून शेख आणि निफाड तालुका पत्रकार संघाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आसिफ पठाण यांचा बाजार समितीच्या वतीने शाल आणि हारगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला पदाधिकारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना वक्त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज शेजवळ यांनी अत्यंत खुबीने केले, तर उपस्थितांचे आभार बाजार समितीचे सदस्य छबुराव जाधव यांनी मानले.

## सारथी तर्फे तंबाखू व्यसनमुक्तीची होळी

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०३, सोलापूर :** सामाजिक बांधिलकी जपत दरवर्षीप्रम ाणे यंदाही सारथी युथ फाउंडेशनच्या वतीने तंबाखू व्यसनम ुक्तीची होळी हा अभिनव उपक्रम उत्साहात पार पडला. सारथी युथ फाउंडेशन संचलित सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राच्या आवारात होलिका दहनाचे आयोजन करण्यात आले होते.शहरातील कामगार वसाहतीतील युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. होलिका दहनाच्या पवित्र परंपरेला सामाजिक संदेशाची जोड देत व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा संकल्प या वेळी करण्यात आला. तंबाखू, गुटखा, मावा, सिगारेट, विडी, हुक्का, ई-सिगारेट, चिलिम आदी तंबाखूजन्य पदार्थांच्या प्रतिकात्मक पाकिटांचे होळीत दहन करून व्यसनमुक्तीचा निर्धार व्यक्त करण्यात आला.या प्रसंगी उपस्थित युवकांनी तंबाखू व्यसनमुक्तीची शपथ घेतली. शपथेचे वाचन सारथी युथ फाउंडेशनचे सचिव रामचंद्र वाघमारे यांनी केले. स्वतः व्यसनमुक्त राहूया, समाज व्यसनमुक्त बनवूया या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम सम ाजात सकारात्मक बदल घडविणारा ठरला.कार्यक्रमास वालचंद महाविद्यालयातील अर्थशास्त्र व समाजशास्त्र विभागाचे व्यंकटेश पंतुवाले, योगेश हसरभावे, महेश रेड्डी, भोलेनाथ जाटब, गणेश पोतदार, प्रविण बाराचारे, यश घोडके तसेच सारथी युथ फाऊंडेशनचे स्वयंसेवक कांचन सुरवसे, अजय इंगळे, अरमान शेख, नागेश्वर स्वामी व राहुल शटगुंडे आदी उपस्थित होते. हा उपक्रम युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करणारा व समाजासाठी प्रेरणादायी ठरला.